| | | |
|---|---|---|
| | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

## प्रेसनोट दि. ३१/०५/२०२३

दि. ३१/०५/२०२३ रोजी १६.०० वा. कॉप्स एक्सलंस हॉल, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर येथे मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली मान्सुनपुर्व तयारीचे अनुषंगाने संबंधित स्वायत्त संस्थांचे अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस पोलीस आयुक्त, पुणे शहर, आयुक्त, पुणे मनपा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा, स्मार्ट सिटी, महामेट्रो, टाटा मेट्रो, पी.एम.आर.डी.ए., पी.डब्ल्यु.डी., कॅन्टोन्मेंट बोर्ड, पी.एम.पी.एम.एल. कडील अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये पुणे शहरामध्ये पावसाळयामध्ये होणारी वाहतूक कोंडी होऊ नये, याकरीता करावयाच्या उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली.

- वॉटर लॉगींग पॉईंटस्
- स्मार्ट सिटीचे कामामुळे वॉटर लॉगींग ठिकाणे तयार होणे
- मेट्रो / महामेट्रोची कामे – त्याचा राडारोडा रस्त्यावर असल्याने वाहतूक कोंडी / महामेट्रोचे स्टेशनची कामे
- पुणे शहरात सुरु असलेली उड्डाणपुलांची कामे.
- ड्रेनेज लाईन / पावसाळी पाईप लाईन / पिण्याचे पाण्याची पाईपलाईन वगैरे कामामुळे रस्त्याची दुरावस्था
- ड्रेनेजची तुटलेली झाकणे
- रस्ता नादुरुस्ती
- नाले सफाई (आंबील ओढा/कोळेवाडी नाला/ दळवी नगर चौक, आंबेगांव नाला/जांभुळवाडी नाला वगैरे)
- पी.एम.पी.एम.एल. बसेस वारंवार बंद पडणे
- वाहतूकीस अडथळा ठरणारे अतिक्रमण कारवाईचे

पावसाळयामध्ये होणा-या वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने सर्व कामे लवकरात लवकर पुर्ण करुन घेणेबाबत मा. आयुक्त, पुणे मनपा व पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सर्व संबंधितांना सूचना दिल्या.

अचानक पाऊस झाल्यास उद्‌भवणा-या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात तसेच सर्व संबंधित यंत्रणांचा एकमेकांशी समन्वय रहावा याकरीता, सर्व संबंधित स्वायत्त संस्थांचे कार्यालयामध्ये कंट्रोल रुम तयार करण्यात येणार असून यांचेकडील सर्व विभांागचे अधिकारी यांचा व्हॉटस् ॲप ग्रुप तयार करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाळयामध्ये वाहतूक नियमानाकरीता पुणे मनपा, महामेट्रो, टाटा मेट्रो यांचेकडून अतिरिक्त वॉर्डन वाहतूक शाखेस पुरविण्याबाबत आयुक्त, पुणे मनपा यांनी आदेश दिले.

**सही /-**
**( विजयकुमार मगर )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर